**संमेलनाध्यक्षाचे मनोगत**

# महाराष्ट्रातील नव सामाजिक चळवळी

**प्रा. बाबासाहेब फलके**

**शिक्षणमहर्षी बापुजी साळुंखे महाविद्यालय, कराड.**

शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेच्या 26 व्या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने होत असलेल्या या ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्रात आपणा सर्वांचे स्वागत व आपणा सर्वांना नमस्कार.

आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण ज्यांच्या विचारांवर झाली ते फुले, शाहू व आंबेडकर, नव महाराष्ट्राचे घडी बसवणारे आदर्श नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, आजच्या महाराष्ट्रात शिक्षणाची गंगा खेडोपाडी पोहोचवणारे कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे इत्यादींसारखे शिक्षण क्षेत्रातील भगीरथ, विना सहकार नही उद्धार हे ब्रीद घेऊन सहकाराच्या माध्यमातून कृषी—औद्योगिक समाजाची उभारणी करणारे पद्मश्री विखे—पाटील, पद्मभूषण वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, राजारामबापू पाटील व संपूर्ण महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्रातील धुरंधर या सर्वांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

मित्रहो आजच्या या ऑनलाईन राष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये आपण महाराष्ट्रातील नव सामाजिक चळवळी बद्दल विचार मंथन करणार आहोत. नवीन सामाजिक चळवळ ही आजच्या काळातील एक लोकप्रिय संकल्पना आहे. सर्व साधारणत: आधुनिकोत्तर विषयांशी संबंधित चळवळींना किंवा महिला पर्यावरण, व्यक्तिस्वातंत्र्य व शांतता विषय चळवळींना नवीन सामाजिक चळवळ असे संबोधले जाते. मानवतावाद हा या चळवळीचा गाभा असतो त्यांचे स्वरूप राजकीय असण्यापेक्षा सामाजिक असते त्यांना सत्तेपेक्षा स्वायत्तता मिळवण्यात रस असतो, सामाजिक स्थित्यंतर हेच त्यांचे उद्दिष्ट असते व या चळवळीचे नेतृत्व हे मध्यमवर्गातून आलेले असते. सर्वसाधारणत: 1980 नंतरच्या चळवळींचा समावेश या चळवळीत केला जातो.

मित्रहो 1980 ते 2020 हा कालखंड हा अतिशय अल्प म्हणजे अवघा चाळीस वर्षांचा कालखंड आहे. सामाजिक चळवळीच्या दृष्टीने तर तो अतिशय अल्प असा कालखंड आहे. परंतु हा कालखंड अतिशय अल्प जरी असला तरी तो वैशिष्ट्यपूर्ण असा कालखंड आहे, याकडे आपणास दुर्लक्ष करता येणार नाही. कारण या कालखंडात संपूर्ण जगभर अशा काही घटना घडून गेल्या की त्यांचे पडसाद संपूर्ण जगभर पडले शीतयुद्धाचा अंत, रशियाचे विघटन वमहासत्ता म्हणून ऱ्हास, जागतिकीकरणाचा स्वीकार यासारख्या घटनांनी जगभरच्या प्रचलित व्यवस्थांना मोठे धक्के बसले, इतकेच नव्हे तर संपूर्ण जगच त्यामुळे बदलले गेले .या बदलत्या जगातील घटनांचे परिणाम जसे जगभरातील राजकीय व्यवस्थांवर होत गेले तसे ते सामाजिक चळवळींवर होत गेले. याला महाराष्ट्र देखील अपवाद राहिला नाही महाराष्ट्रातील या काळातील चळवळींवर ही या स्थित्यंतराचे मोठे इष्ट—अनिष्ट परिणाम होत गेले.

मित्रहो आज महाराष्ट्र हे आपल्या देशातील एक प्रगतिशील व पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते .आजच्या महाराष्ट्राला ही ओळख प्राप्त करून देण्यामध्ये येथील संतांची व सुधारकांची प्रबोधन चळवळ, प्रदीर्घ काळ चाललेल्या स्वातंत्र्यलढ्यातील आपल्या राज्यातील नेत्यांचा व जनतेचा सहभाग, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील लोकांचा सहभाग कारणीभूत ठरला तसेच साठोत्तरी महाराष्ट्रात सर्व क्षेत्रात झालेले औद्योगीकरण, सत्तेचे विकेंद्रीकरण, हरित क्रांती, धवलक्रांती, शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, सहकाराचा विकास, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा अवलंब यासारखे प्रयोग व या प्रयोगातून आजचा महाराष्ट्र घडत आलेला आहे मित्रहो या काळात महाराष्ट्रात अनेक स्थित्यंतरे झाली. राज्यभर एमआयडीसीचे जाळे विणले गेले, सरकारी चळवळीच्या माध्यमातून साखर कारखाने, सूतगिरण्या, बँका, दूग्ध व्यवसाय, पंचायत राज्य संस्थांच्या माध्यमातून झालेले लोकशाही विकेंद्रीकरण यामुळे महाराष्ट्राची विकासाकडे वाटचाल होऊ शकली. त्याच बरोबर कर्मवीर भाऊराव पाटील, शिक्षण महर्षी बापूजी साळुंखे

यांच्यासारख्या शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या प्रयत्नांमुळे व अपार मेहनतीमुळे येथे शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचू शकले तसेच या सर्व घडामोडींचा महाराष्ट्राच्या संपूर्ण जन् माणसांवर फार मोठा परिणाम होत गेला येथील दलित स्त्रिया ग्रामीण जनता यांना एक आत्मभान येऊ शकले, ते राजकीयदृष्ट्या जागृत होत गेले व त्यांचा राजकीय व सामाजिक सहभाग वाढत गेला. लोकांमधील या बदलाचा परिणाम येथील सामाजिक चळवळींवर होत गेला त्या चळवळींमध्ये देखील लोकांचा सहभाग वाढत गेला त्यामुळे नामांतर किंवा इतर दलित चळवळी, स्त्रीमुक्ती चळवळ व शेतकरी संघटनांची आंदोलने यामध्ये मोठा लोकसहभाग आपणास दिसून येऊ लागला .

अर्थात हे चित्र आपणास एका बाजूला दिसत असले तरी 1990 नंतर जागतिकीकरणाची लाट आली व जुनी सर्व समीकरणे बदलत गेली. कारण जागतिकीकरणाने सर्व क्षेत्रात ग्लोबल ते लोकल असे बदल घडून आले, जुने संदर्भ बदलले, नवी भांडवलशाही व्यवस्था आकारास आली. या व्यवस्थेने विज्ञान तंत्रज्ञानाचा आधार घेतला व मोठ्य प्रमाणावर उत्पादन वाढू शकले. परंतु त्याचबरोबर दुसऱ्या बाजूला रोजगार कमी होऊन बेरोजगारी वाढली, कामगार संघटना मोडीत निघाल्या त्या अगोदरच मुंबईतला गिरणी कामगार विस्थापित झाला होता. या व्यवस्थेवर प्रत्येकजण फक्त स्वतःचा विचार करू लागला, संघटीत होऊन लढा देण्याचे प्रयत्न कामगारांकडून होईना हे झाले. कामगारांमधील या अवस्थेला कामगारांचे कामगारांकडून होत असलेले शोषण असे संबोधले जाऊ लागले. विस्थापित फक्त कामगारच न राहता खेडोपाडी, शहरातील झोपडपट्टी राहणारा दलित बांधव असेल मोठ्या धरणामुळे विस्थापित झालेला धरणग्रस्त असेल किंवा शिक्षणाच्या प्रसारामुळे शिक्षणाची संधी मिळून स्व सामर्थ्याची जाणीव झालेला परंतु आपल्या कर्तुत्वाला वाव मिळत नसल्याने अस्वस्थ व चिंतातुर असलेला स्त्रियांचा मोठा वर्ग असेल, आपल्या शेतामध्ये मुबलक उत्पादन घेऊनही त्यासाठी रात्र—दिवस कष्ट उपसूनही आपल्या शेतमालाला रास्त भाव मिळत नसल्याने अडचणीत आलेला आत्महत्याग्रस्त शेतकरी असेल ते सर्वजण या काळात असमाधानाच्या गर्तेत अडकल्याचे दिसून येते. त्याच बरोबर जागतिकीकरणानंतर उदयास आलेल्या या नव भांडवलशाही व्यवस्थेत कल्याणकारी राज्याची संकल्पना कालबाह्य ठरत गेल्याने या वर्गात आपण निराधार होत गेल्याची भावना वाढू लागत असल्याचे दिसून येते आणि त्यामुळे तो निराशेच्या गर्तेत अडकल्याने त्याचा एकूणच सर्व व्यवस्थांवरील विश्वास उडत गेल्याचे दिसून येते. हे असेच चालायचे अशा प्रकारची मानसिकता त्यांच्यात रुजत गेली याबरोबरच जागतिकीकरणाच्या काळात आपणासमोर जागतिक तापमान वाढ, अति वअनियमित पर्जन्य व दुष्काळ, वाढते प्रदूषण, विविध साथींचे आजार इत्यादी समस्यांनी वैश्विक रूप धारण केले त्याचा परिणाम म्हणून समाजातील धुरिणांचे लक्ष या समस्यांनी आपल्याकडे वेधून घेतले. परिणामी या अगोदरच्या काळात या चळवळींमध्ये मध्यवर्ती असलेले जात, भाषा, वर्ग, लिंग या घटकांचा प्रभाव कमी होत गेला व त्यांची जागा पर्यावरण, शांतता, व्यक्तीस्वातंत्र्य इत्यादी घटकांनी घेतल्याचे दिसून येते महाराष्ट्राचा विचार करता महाराष्ट्रात या काळात आरक्षणव राखीव जागा, शेतकरी आंदोलन व काही प्रमाणात स्त्रियांच्या चळवळी यांचे काही अपवाद सोडले तर आपल्याकडे सुद्धा या काळात पर्यावरण, जागतिक शांतता, वाढते प्रदूषण इत्यादी मुद्द्यांची चर्चा आपल्या विचारविश्वात होत गेली. त्याचबरोबर सामाजिक चळवळीच्या दृष्टीने आढावा घेता सामाजिक चळवळी चा प्रभाव कमी होत आहे किंवा पूर्वीप्रमाणे राज्यकर्त्यांवर त्यांचा वचक आज दिसून येत नाही. काही अपवाद वगळता फार मोठे यश या चळवळींच्या पदरात पडताना आपणास दिसत नाही. नर्मदा आंदोलनाचा धरण विरोध हा मध्यवर्ती मुद्दा असतानादेखील ते धरण पूर्ण झाल्याचे आपणास दिसत आहे. मात्र धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत या आंदोलनाला यश मिळालेले दिसत आहे. महाराष्ट्रात शेतकरी आंदोलनाला काही प्रमाणात यश मिळत असल्याचे ऊस, कापूस यासारख्या पिकांना वदूधाला जरी वाढून भाव मिळाला असला तरी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशींच्या अंमलबजावणीबाबत आग्रही

मागणी करून देखील त्यांच्या पदरात फार काही पडल्याचे दिसून येत नाही. मराठा मुस्लिम आरक्षणाच्या संदर्भात देखील थोड्याफार फरकाने तसेच चित्र आपणास पहावयास मिळत आहे सहाजिकच या सर्वांचा चळवळींचा परिणामकारक तेवर व त्या चळवळीमधील लोकांच्या सहभागावर अनिष्ट परिणाम होताना दिसत आहेत. मत्रहो 1980 नंतर महाराष्ट्राचा विचार करताना आपणास असे दिसून येते की फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारतभर डाव्यां चळवळीची मोठ्याप्रमाणावर पीछेहाट होताना दिसत आहे. 1990 च्या दशकाच्या प्रारंभीच घडून आलेले बाबरी मशीद प्रकरण, राम मंदिराचा प्रश्न, स्वतंत्र काश्मीरचा मुद्दा, मुंबई बोंब स्फोट व गुजरात दंगली इत्यादी घटनांमुळे उजव्या शक्तीं ची ताकद वाढत गेली व डाव्या शक्तींची मोठ्या प्रमाणावर पीछेहाट होत गेली.या बाबींचा येथील सामाजिक चळवळींवर फार मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. कारण आतापर्यंतच्या महाराष्ट्रातील चळवळींचा आढावा घेतला असता त्यामध्ये या विविध चळवळींमध्ये डाव्या संघटनांचा सहभाग लक्षणीय असल्याचे दिसून येते. परंतु आता डाव्या शक्तींचा प्रभाव कमी झाल्याने येथील सामाजिक चळवळींवर फार मोठा परिणाम झाल्याचे दिसून येते .

मित्रहो आज या सर्व परिस्थितीतून महाराष्ट्रातील सामाजिक चळवळींची वाटचाल चालू असताना आज संपूर्ण जगासमोर कोरोना महामारी चे संकट उभे ठाकले आहे. एकीकडे कोरोना महामारीच्या या भीषण संकटामुळे संपूर्ण जगभर मृत्यूचे तांडव चालू आहेत तर त्यावर उपाय म्हणून चालू झालेल्या लॉकडाऊनमुळे संपूर्ण जगच स्तब्ध झाल्याचे आपणास दिसत आहे.आज आपण जिवंत कसे राहू?या एकाच प्रश्नाने सर्वांना ग्रासले आहे. आज आपण प्रचंड भीतीयुक्त व तणावग्रस्त वातावरणात वावरत आहोत. हे संकट नेमके केव्हा टळेल.? कोरोनानंतरचे जग कसे असेल? त्याचे विविध क्षेत्रांवर निश्चित कोणते परिणाम होऊ शकतील इत्यादी प्रश्नांबद्दल आज आपण केवळ अंदाज व्यक्त करू शकतो. त्यावर अधिकृत असे भाष्य करू शकत नाहीत. त्यामुळे कोरोना संकटाचे सामाजिक चळवळींवर होणाऱ्या विविध परिणामांबाबत ही आपणास अंदाजच व्यक्त करावे लागतात. एक मात्र निश्चित की कोरोना संकटामुळे भविष्यात आपणास अनेक विविध प्रश्नांना सामोरे जावे लागणार आहे. त्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी ज्याप्रमाणे राजकीय व्यवस्थांना पुढाकार घ्यावा लागेल त्याप्रमाणेच सामाजिक चळवळींना सुद्धा मागे राहून चालणार नाही अशा परिस्थितीत सामाजिक अंतरा सारख्या कोरोनावरील उपाययोजनांबाबत ची बंधने पाळून चळवळीतील लोकसहभाग कशा स्वरूपाचा असावा, निश्चित भूमिका काय असावी व राज्यसंस्थेकडे पहाण्याचा चळवळीचा दृष्टिकोन नेमका कोणता असावा याबाबत चळवळीं समोर काही पेच निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यांची सोडवणूक करूनच आपणांस पुढे जावे लागणार आहे. अलीकडच्या काळात क्षीण होत गेलेल्या या चळवळींना उभारी देण्यासाठी आक्रमक अहिंसावाद, राजकीय सहभाग वृद्धी व मोठ्या प्रमाणावर प्रबोधन यासारख्या उपायांनी या चळवळी ना उभारी देण्यासाठी यासारखे उपाय चळवळींच्या अभ्यासकांकडून सुचवले जात होते तसे यापुढच्या काळात निश्चित कोणते आव्हाने समोर उभे राहू शकतील व त्या आव्हानांना सामोरे जाऊन या चळवळी प्रभावी कशा होतील. याबाबतचे चिंतन आजच्या या ऑनलाईन चर्चासत्रात होईल अशी अपेक्षा व्यक्त करतो व पुन्हा एकदा आपणा सर्वांचे मन:पूर्वक आभार मानून थांबतो.
जय हिंद, जय महाराष्ट्र, जय बापूजी!